
“मराठी मंडळ सॅक्रामेंटो”चे त्रैमासिक

# अभिरुची

“ज्योतीने तेजाची आरती, वंदुया पुण्यात्म्यांच्या स्मृती”

दिवाळी विशेषांक २०१९




- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील

# २०१९-२० अंक # ३


- संपादकीय — हिमानी कुलकर्णी
- जुने नाते — स्मिता कुलकर्णी
- शब्दप्रभू ग. दि. मा. — प्रतिभा कुलकर्णी
- पु. ल. — अजित नातू
- "भाई " चित्रपट माझ्या नजरेतून — हिमानी कुलकर्णी
- कविता: अनमोल पुंजी — स्मिता कुलकर्णी
- चित्रकथी: दीपावली — सुलभा हारदे
- फ्लॅशबॅक : आयुष्य — भगवती कौस्तुभ उपाध्ये
- उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर — कार्यकारिणी

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

तुम्हा सर्वांना दीपावली आणि नवीन वर्षाच्या अनेक शुभेच्छा!! कशी काय झाली तुमची दिवाळी ? फराळ खाऊन संपला की नाही अजून? दिवाळीच्या फराळाची रुची घेऊन झाली असेल तर आता थोडी वैचारिक फराळाची रुची घेऊया का ? बरोबर ओळखलंत. "अभिरुची" चा हा दिवाळी विशेषांक म्हणजे वैचारिक आणि कलात्मक फराळाची मेजवानीच आहे.

२०१९ जवळ जवळ संपत आले आहे. वर्ष जसजसं सरत येतं , तसं आपल्या मनात नकळत वर्षाचा लेखा जोखा मांडणं चालू होतं. हे वर्ष भारतीयांसाठी अनेक कारणांमुळे विशेष होतं. लोकसभा निवडणूक, आय सी सी विश्वचषक, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, अनेक वर्षे चाललेल्या सामाजिक आणि राजकीय विषयांवरील वादग्रस्त प्रश्नांचे निकाल, भारताच्या इस्रो ची ऐतिहासिक चांद्रमोहीम, भारत अमेरिकेचे एकमेकांना "Howdy" म्हणत आपापसातले मैत्र जपणे ...अशा एक ना अनेक घटना. खरंच अगदी इव्हेंटफुल वर्षच म्हणावे लागेल. पण मराठी माणसासाठी या वर्षाचे विशेष महत्व अजून एका गोष्टीमुळे आहे. साधारण एक शतकापूर्वी महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत तीन अनमोल रत्नांनी जन्म घेतला होता. ह्या तीन रत्नांनी त्यांच्या अलौकिक प्रभेमुळे अनेकांचे जीवन उजळून टाकले. ही रत्ने म्हणजे पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके अर्थात आपले सर्वांचे लाडके पु. ल., गदिमा आणि बाबूजी. २०१९ हे या तीन अवलियांचे जन्मशताब्दी वर्ष. या वर्षीचा दिवाळी विशेषांक ह्या तीन दिग्गजांच्या स्मृतींना आणि कार्याला समर्पित करत आहे. आपल्या मंडळातर्फे त्यांना वाहीलेली ही आदरांजली म्हणजे मुखपृष्ठावर म्हंटल्याप्रमाणे एखाद्या छोट्याशा ज्योतीने सूर्याच्या तेजाची आरती करावी तसंच आहे.

मुखपृष्ठाचा विषय सुरु झालाच आहे तर त्याविषयी काही विशेष उल्लेख करावासा वाटतो. मुखपृष्ठावरील रेखाचित्र (स्केच) काढले आहे आपल्या मंडळातील गुणी कलाकार कविता केतकर हिने. कविता खूप सुंदर गाते हे मला माहीत होते आणि बऱ्याचदा तिचे गाणे ऐकलेही होते. तिच्या चित्रकलेबद्दल ऐकून होते पण हा गुण जवळून अनुभवण्याची फारशी वेळ आली नव्हती. "दिग्गजांची जन्मशताब्दी" ही कल्पना सुचल्यानंतर मी सहज कविताला विचारलं कि या थिम वर काही चित्र काढू शकशील का? त्यावर तिने आनंदाने होकार दिला आणि नुसते व्यक्तीचित्रच नाही तर अतिशय कल्पक अशी कलाकृतीच बनवली. कला क्षेत्रातील या ब्रह्मा, विष्णू आणि महेशाला घेऊन तिने ६४ कलांचे स्वामी म्हणजे साक्षात दत्तगुरूच समोर उभे केले. पहिल्यांदा हे चित्र पाहिल्यावर मी तर अगदी भारावून गेले. ही कल्पना सुचणं आणि त्यानंतर ती मूर्तरूपात आणणं हे एका अत्यंत संवेदनशील आणि कसलेल्या कलाकाराचं लक्षण आहे. दत्तगुरुंसमोर नतमस्तक झालेल्या त्या मुलाच्या चित्राने आपल्या सर्वांच्या मनातील भावना अगदी चपखलपणे व्यक्त होतात. त्याचबरोबर बाबूजींच्या हातात पेटी आणि गोवा मुक्तिसंग्राम ध्वज, पुलंच्या हातात लेखणी आणि मायक्रोफोन तर गदिमांच्या हातात गीतरामायण असे शोभून दिसतात जणू प्रत्येक देवाच्या हातातील शस्त्र. या सुंदर आणि कल्पक चित्राबद्दल कविताचे खूप खूप अभिनंदन !

सुधीर फडके म्हणजेच बाबूजींच्या गाण्यांशी आपल्या सर्वांचे एक अत्यंत जिव्हाळ्याचे असे नाते आहे. लोणचे किंवा वाईन या गोष्टी कशा जितक्या जुन्या होत जातात तितक्या जास्त चविष्ट आणि classy होतात तसेच काहीसे बाबूजींच्या गाण्यांचे आहे. अनेक वर्षे झाली तरी त्यांची गाणी आजही तितकीच , किंबहुना थोडी जास्तच गोड आणि नवीन वाटतात. "जुने नाते " या लेखात स्मिता कुलकर्णी आपल्याला सांगत आहेत बाबूजींच्या गाण्यांशी असलेल्या त्यांच्या जुन्या आणि जाणत्या नात्याबद्दल. त्यांच्या नेहमीच्याच प्रवाही लेखनशैलीतला हा माहितीपूर्ण लेख तुम्हाला नक्कीच बाबूंजींनी गाजवलेल्या सुवर्णकाळात घेऊन जाईल.

हा अंक माझ्यासाठी खास असण्याचे अजून एक कारण म्हणजे या अंकाद्वारे माझ्या आईने म्हणजेच सौ. प्रतिभा कुलकर्णी यांनी लेखिका म्हणून "अभिरुची" परिवारात पदार्पण केले आहे. गेल्या दोन अंकांपासून लेख दे म्हणून तिच्या मागे लागले होते पण त्याला आत्ता मुहूर्त मिळाला. पदार्पणाला विषय पण तसाच दमदार पाहिजे म्हणूनच कदाचित ती वाट बघत असावी. असो. तर मी आईला सहज म्हंटलं कि बाबूजी आणि पुलंवर साहित्य आहे पण गदिमांवर अजून कोणी लिहिलं नाही. हे ऐकताच आईसाहेबांनीं आव्हान स्वीकारलं आणि लेखणी हातात घेतली. "शब्दप्रभू ग.दि.मा." या लेखात वाचा गदिमांच्या शब्दांशी आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर जुळलेले लेखिकेचे नाते आणि त्यातून होत गेलेली लेखिकेची वैचारिक उत्क्रांती याची रंजक कहाणी.

पु. लं. .....!! पुलं हा एक अनुभव आहे. त्यांचे वर्णन करणे शक्य नाही. ते ज्याचे त्यानेच अनुभवावे. "गोड़" ही चव जशी वर्णन करून सांगता येत नाही तर ती अनुभवावी लागते अगदी तसेच. "अनंतहस्ते कमलावराने, देता किती घेशील दो करा ने" अशी अवस्था

होते पुलंचे लिखाण वाचताना, त्यांचे संगीत ऐकताना, चित्रपट पाहताना आणि माणूस म्हणून त्यांना अनुभवताना. "पु. ल. " या लेखात आपल्या पुलंबद्दलच्या भावना व्यक्त केल्या आहेत आपल्या मंडळाचे अध्यक्ष अजित नातू यांनी. त्यांच्या खुमासदार आणि संवादात्मक शैलीतील हे लिखाण वाचायला तुम्हाला मजा येईल यात शंका नाही.

२०१९ च्या सुरुवातीलाच "भाई: व्यक्ती कि वल्ली" हा चित्रपट प्रदर्शित झाला. प्रत्येक पुलं प्रेमीने अगदी आवर्जून तो बघितला. या चित्रपटाबद्दल अनेक मिश्र प्रतिक्रिया ऐकायला आणि वाचायला मिळाल्या. हा चित्रपट पाहून आल्यावर मी माझ्या सोशल मीडिया अकाउंट वर त्याबद्दलची माझी प्रतिक्रिया लिहिली होती. हे काही चित्रपट समीक्षण नाही. एक सामान्य पुलप्रेमी असलेल्या मला दिसलेला चित्रपट कसा होता हे सांगण्याचा हा प्रांजळ प्रयत्न - "भाई चित्रपट माझ्या नजरेतून" या लेखात.

यानंतर "कविता" विभागात वाचा स्मिता कुलकर्णी रचित कविता "अनमोल पुंजी". कवितेतून भाव व्यक्त करणं खूप आव्हानात्मक असतं. त्यातही जर ह्या दिग्गजांबद्दल बोलायचे असेल तर ते अजून कठीण. मराठी कला क्षेत्रातील ही तीन रत्ने म्हणजे अनेक पिढ्यांनी जतन करावी अशी अनमोल पुंजीच आहे आणि हाच भाव अगदी नेमक्या शब्दात कवयित्रीने या कवितेत मांडला आहे.

"चित्रकथी" या सदरात आपली नेहमीची आवडती आणि टॅलेंटेड फोटोग्राफर सुलभा हारदे हिने दिवाळीतील काही क्षणचित्रे आपल्याशी शेअर केली आहेत. नेहमीप्रमाणेच सुलभाने काढलेली छायाचित्रे शब्दांशिवाय देखील खूप बोलकी वाटतात.

कधी कधी आयुष्यातले काही छोटे प्रसंग आपल्या स्मृतीपटलावर कोरले जातात. ते एक "घटना" म्हणून फार मोठे नसले तरी त्यातून मिळालेला अनुभव आणि झालेली जाणीव हे दोन्ही खूप परिणामकारक असतात. असाच एक रंजक प्रसंग भगवती उपाध्ये हिने "फ्लॅशबॅक" या सदरात शब्दबद्ध केला आहे. "आयुष्य" या लेखाद्वारे भगवतीने अभिरुची लेखक यादीत पदार्पण केले आहे. तिची निरागस आणि सहज लेखनशैली खूप भावणारी आहे.

तर मंडळी, मी नेहमी "संपादकीय" मध्ये म्हणते कि "हा अंक तुमच्या हातात देताना मला आनंद होत आहे". पण या वेळचा आनंद काही वेगळाच आहे. गीत रामायण ऐकताना, बटाट्याची चाळ वाचताना, वाऱ्यावरची वरात, असा मी असामी पाहताना होणारा जो आनंद असतो ना तसाच हा आनंद आहे ...मन आणि डोळे भरून टाकणारा. पुलं , गदिमा आणि बाबूजी या तीन दात्यांनी देणं कधी थांबवलंच नाही .... ते असतानाही देत होते आणि आता नसतानाही देत आहेत. या अंकावर काम करताना मला जो आनंद मिळाला तो शब्दात सांगता येत नाही. या पुण्यात्म्यांना "अभिरुची " च्या माध्यमातून छोटीशी आदरांजली वाहण्याचं माझं हे छोटंसं स्वप्न पूर्ण करण्यात वर उल्लेख केलेल्या सर्व व्यक्तींचा हातभार आहे. त्या सर्वांना मी खूप मनापासून धन्यवाद देते! तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या पुन्हा एकदा शुभेच्छा. भेटूच पुन्हा पुढच्या अंकात पुढच्या वर्षी !!

आपली स्नेहांकित,



**-हिमानी कुलकर्णी**

**(संपादक, अभिरुची - मराठी मंडळ सॅक्रामेंटो )**

PNG
JEWELERS

sanskrit
new age indian

# *जुने नाते*

आमचे घराणे संगीतप्रेमी. दर्जेदार गायकीला अगदी मनापासून दाद देणारे. आई शास्त्रीय संगीत शिकलेली असल्यामुळे बालपणापासून संगीताचे बीज आम्हा भावंडात रुजले गेले. एकत्र कुटुंबात वाढल्यामुळे कोणी ना कोणी सतत गात असलेले कानावर पडायचे. सूर, तालाची जाण त्यामुळे लवकर रोवली गेली. सकाळी आणि संध्याकाळी रेडिओवर लागलेली गाणी ऐकायला मिळायची. कुमार गंधर्व, पंडित भीमसेन जोशी, पंडित जितेंद्र अभिषेकी, वसंतराव देशपांडे, किशोरी आमोणकर, माणिक वर्मा, परवीन सुलताना, हिराबाई बडोदेकर, मंगेशकर भावंडे, अरुण दाते आणि सुधीर फडके अशा कितीतरी अवलियांच्या सतत कानावर पडणाऱ्या गायकीच्या सुरेल सुरांनी आणि सांगितिक संस्कारांनी माझे बालपण संपन्न होते आणि त्याचमुळे अगदी लहान असतानाच सुधीर फडकेंच्या सुमधूर, अर्थपूर्ण आणि भावुक गंधर्व गायनाशी जवळून ओळख झाली. आजी आणि आजोबांना त्यांचे गीत रामायण आवडीने ऐकताना पाहिल्याचे आठवते. विशेषतः बाबा, आत्या, काकी आणि माझा मोठा चुलत भाऊ त्यांच्या गाण्यावर अगदी फिदा असायचे. त्यांच्या तोंडी सतत फडक्यांची विविध गीते असायची. गायनाची विलक्षण आवड असल्यामुळे माझ्या लहानपणच्या आठवणींच्या पोतडीत सुद्धा सुधीर फडकेंच्या गाण्यांचे स्थान अगदी वरचे आहे. बाबूजींनी गायलेली अनेक गाणी त्यांच्या वेगळेपणामुळे हृदयात ठसली आहेत.त्यांच्याशी एक जुनं नातं जमलं आहे.ती गाणी आजही ऐकताना लहानपणी जगलेल्या दिवसांच्या अनेक आठवणी जाग्या होतात आणि म्हणून ती खूप जवळची वाटतात. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने मनात उठलेले काही भावनिक तरंग लिहावेसे वाटले आणि म्हणून हा खटाटोप.



मराठी माणसाच्या घराघरात अजरामर झालेले संगीतकार आणि गायक सुधीर फडके यांचा जन्म २५ जुलै, १९१९ साली कोल्हापुरात झाला. पंडित वामनराव पाध्ये हे त्यांचे पहिले गुरु. वडिलांच्या अचानक निधनाने आणि त्यामुळे आलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे नोकरीच्या शोधार्थ ते मुंबईत गेले आणि त्यांनी १९४१ साली एच एम व्ही कंपनीत काम सुरु केले. त्यानंतर १९४६ ला त्यांनी व्ही शांतारामच्या प्रभात फिल्म कंपनीचे संगीतकार म्हणून काम करायला सुरुवात केली, ज्यामुळे हिंदी-मराठी चित्रपट सृष्टीद्वारे

लोकांना त्यांच्या कर्णमधुर संगीताची आणि स्वरांची ओळख झाली. आई वडिलांनी दिलेले 'राम' हे नाव बदलून त्यांनी आपले पहिले गीत संगीतबद्ध करताना स्वतःचे नाव 'सुधीर' केले पण सर्वांसाठी ते 'बाबूजी' या नावानी प्रसिद्ध झाले. 'गोकुल' हा त्यांनी संगीतबद्ध केलेला पहिला हिंदी चित्रपट. उत्तर भारतात दोन वर्ष दौरा करून त्यांनी वेगवेगळ्या प्रांतातील लोकसंगीताचा अगदी जवळून अभ्यास केला होता आणि त्या शिक्षणाचा वापर अतिशय कौशल्याने त्यांनी आपल्या संगीतात केला. त्यांनी दिलेल्या सुमारे ११० चित्रपटांच्या संगीताने आणि संगीतबद्ध केलेल्या अनेक भक्तिगीते, भावगीते आणि मराठी लावण्यांनी ते घराघरातल्या भावविश्वात जाऊन पोहचले.

१९४३ साली त्यांची पार्शवगायिका ललिता देऊळकर यांच्याशी ओळख झाली. पुढे १९४९ मध्ये बाबूजींनी संगीतबद्ध केलेल्या 'संत जनाबाई' या चित्रपटासाठी त्या गायल्या. रेकॉर्डिंगसाठी स्वतःच्या आईबरोबर पुण्याला स्टुडिओत गेल्याची आठवण ललिताताई सांगतात. त्यांच्या आईच्या आणि बाबूजींच्या भाऊ आणि वाहिनीच्या खटपटीमुळे २९ मे, १९४९ रोजी बाबूजी व ललिता देऊळकर विवाहबद्ध झाले. अत्यंत साध्या पद्धतीने झालेल्या त्यांच्या लग्नाचा सर्व खर्च दोन्ही भावांनी मिळून उचलला असेही त्या दिलखुलासपणे नमूद करतात. त्यांच्या लग्नातल्या मंगलाष्टका गाणारा होता ललितातार्ईंच्या बरोबरीचा प्रसिद्ध गायक, मोहमद रफी!

'सुधीर फडके' हे नाव माझ्यासाठी एक मोठं स्मृतींचं भांडार आहे. त्यांनी गायलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या विविध गाण्यांच्या आठवणीत माझे बालपण दडले आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल लिहणे म्हणजे माझ्यासाठी जुन्या नात्यांना उजाळा देणे, आजी, आजोबा, आत्या, काका, काकी आणि चुलत भावाबहिणींच्या बरोबर राहिलेल्या एकत्र कुटूंबातल्या बालपणीच्या रम्य आठवणी परत एकदा सजीव करणे. त्यांच्या गाण्यांची व्यापकता अतिशय विशाल होती. नवरसापैकी शृंगार, हास्य, वीर, करुणा आणि भक्ती या रसांनी भरलेल्या काव्यांना त्यांनी ओतप्रोत करून घराघरात नेऊन पोहचवले.

देहाची तिजोरी, कुठे शोधिसी रामेश्वर, तुझे गीत गाण्यासाठी, समाधी साधन, तुज सगुण म्हणू की निर्गुण रे, देव देव्हाऱ्यात नाही, अशी अध्यात्मिक पातळीवरची गाणी, ज्यांच्या शब्दांमध्ये मर्म दडलेले आहे, त्यांची अंतर्मुख करणारी भाषा बाबूजींच्या आवाजाने आणखीच वजनदार झाली. प्रत्येक शब्द, त्याची भव्यता आणि त्यामागचे भाव बाबूजींच्या स्वरांतुन त्या गाण्यांतून ऐकताना अध्यात्माविषयी पडलेल्या कितीतरी प्रश्नांची उत्तरे मिळतात. जगदीश खेबुडकर, गदिमा, मंगेश पाडगावकर आणि संत ज्ञानेश्वर यांच्यासारख्या असामींनी लिहलेल्या त्या कमालीच्या प्रतिभावंत ओळी आपल्या गीतातून प्रस्तुत करताना बाबूजींनी ठेवलेली कवींच्या शब्दांची जाणीव आणि त्यांना दिलेला योग्य न्याय त्या काव्यांना अतिशय हृदयस्पर्शी करतो. मनाला शांतता देणारी ही बाबूजींनी गायलेली सुमधुर गाणी ऐकताना त्यामध्ये एकरूप न होऊन जाणे म्हणजेच नवल आहे.

तोच चंद्रमा नभात, स्वर आले दुरुनी, प्रिया आज माझी नसे साथ द्याया, सखी मंद झाल्या तारका, धुंद येथ मी स्वैर झोकीतो, विसर गीत विसर प्रीत, अशी ओथंबलेली विरहगीते ज्यातून खरोखरीच दुःख, खंत आणि विरहाचे भाव ओतू जातात. कवींच्या भावस्पर्शी शब्दांना गाण्यांत तितक्याच भावनांनी बांधणे हा बाबूजींचा हातखंडा या त्यांच्या गायलेल्या गीतांतून दिसून येतो. शांताबाई शेळकेंनी लिहलेले, अतिशय लोकप्रिय झालेले 'तोच चंद्रमा नभात' हे गाणे लिहतानाची आठवण सांगताना शांताबाई बाबूजींच्या संगीतविषयक ज्ञानाचे, अनुभवाचे, लोकांच्या आवडीच्या अचूक अंदाजाचे खूप कौतुक करतात. "त्यांनी दाखवलेल्या माझ्यावरच्या विश्वासातून माझ्याकडून हे सुरेख गाणे लिहले गेले" असे त्या सांगतात. सुधीर मोघे यांनी लिहलेले 'सखी मंद झाल्या तारका' हे गाणे खरे तर त्यांनी त्यांच्या स्वतःच्या काव्यलेखनाच्या प्रतिभेला उद्देशून लिहले होते. मोघ्यांना गीत लिहायला सांगितले होते आणि त्यांना काय लिहावे हे सुचत नव्हते तर त्यांनी स्वतःच्या कवितेलाच 'सखी' संबोधले आणि गाणे लिहले. राम फाटक या संगीतकारांनी स्वरबद्ध केलेलं हे बाबूजींनी गायलेलं कर्णमधुर गीत काळजात घुसून राहते.

धुंदी कळ्यांना, नवीन आज चंद्रमा, धुंद एकांत हा, जे वेड मजला लागले, चंद्र आहे साक्षीला अशांसारखी आशाताईंबरोबर गायलेली त्यांची द्वंद्वगीते ज्यातून तारुण्यातली नवलाई, उमेद आणि हळुवार, भावयुक्त प्रीती दिसून येते. आशाताई बाबूजींचा उल्लेख 'माझे आद्यगुरू' असा करतात. 'पुढचे पाउल' या चित्रपटासाठी त्या प्रथम बाबूजींच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायल्या. "गाण्यातल्या बारीक सारीक हरकती आणि जागा ते अगदी वेळ देऊन शिकवत आणि त्या त्यांना हव्या तशा येईपर्येंत पुन्हा पुन्हा गायला लावीत" असे आशाताई सांगतात. लावणीचा शृंगार, भूपाळीतली सात्विकता आणि भक्ती व प्रेमगीतातला प्रणय असे अनेक भाव गाण्यातून कसे गहिरेपणाने व्यक्त करायचे हे ते स्वतः गाऊन दाखवत असत असे त्या सांगतात. त्यांच्या चाली अतिशय मधुर आणि इतक्या सहज गुणगुण्यासारख्या असायच्या की त्यांची तरलता आणि पावित्र्य डोक्यात राहून ही युगुलगीते आजही सहजपणे जिभेवर घोळत राहतात.

गीत सादर करताना शब्दातले बारकावे आणि औचित्य लक्षात ठेऊन त्याच्या उच्चाराकडे भान देण्याची कला बाबूजींच्या प्रत्येक गाण्यातून दिसून येते. शब्दोच्चाराच्या बाबतीत असलेली त्यांची एक खास शैली त्यांची गाणी अजुनी वैशिष्ठयपूर्ण करते. प्रत्येक शब्दामागची कवीच्या मनातली आंतरिक समजूत स्वतःच्या भावपूर्ण सूरात पेश करणे त्यांना अगदी सहज जमायचे. त्यांची अजुनी एक विशेष खुबी म्हणजे त्यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांच्या कडव्यातली विविधता. प्रत्येक अंतऱ्यात किंचितसा वेगळेपणा असे, चाल थोडी वेगळी किंवा हरकती वेगव्या जागांना असत. कवींची सुंदर शब्दरचना पुढे आली की त्यांची सर्जनशीलता काम करू लागे आणि त्यांच्या रसिक चाहत्यांना गीताचा एक उत्कृष्ठ नमुना ऐकायला मिळत असे.

बाबूजींनी स्वतःच्या जिद्दीने, प्रतिभेने, शास्त्रीय संगीताच्या ज्ञानाने आणि आत्मविश्वासाने सुगम संगीत पुढे आणले आणि मोठा श्रोतावर्ग तयार केला. "फडक्यांच्या सुगम संगीताविषयी बोलायचे झाले तर भावगीत गायनाच्या क्षेत्रात त्यांनी नवीन युग आणले" असे पंडित भीमसेन जोशी सांगतात. शास्त्रीय संगीतात जसा सूर महत्वाचा असतो तसा सुगम संगीतात शब्द. शब्दांच्या आधारे चाल देऊन भावदर्शन घडवताना गाण्याची तांत्रिक बाजू सांभाळण्याचे काम ते अगदी कुशलपणे करायचे. बाबूजींनी संगीत दिलेल्या मी ‘तुळस तुझ्या अंगणी’ आणि ‘रेशीमगाठी’ या दोन चित्रपटांसाठी पंडित भीमसेन जोशींनी बंदिशी गायल्या होत्या. चित्रपटात पार्शवसंगीत देत असताना त्यातल्या विषयांप्रमाणे आणि पात्रांप्रमाणे त्यांची गीते असत. पोवाडा, लावणी, अभंग, नाच, प्रेमगीत, अशा गीतांच्या अनेक प्रकारांना स्वरसाज दिल्यामुळे त्यांच्या संगीतात विविधता आली आणि त्याचमुळे त्यांची लोकप्रियताही वाढली, त्यांचा श्रोतावर्ग वाढला. संगीत दिग्दर्शनासाठी लागणारा चोखंदळपणा, काटेकोर आणि आग्रही वृत्ती या त्यांच्या गुणांमुळे त्यांच्या संगीताचे माधुर्य रसिकांना त्यांच्या गाण्यांमध्ये हरवून टाकायचे. आकाशी झेप घे रे पाखरा, संथ वाहते कृष्णामाई, अशी पाखरे येती, कधी बहर कधी शिशिर, अशी भावगीते त्यातल्या अतिशय गोडव्याने स्मृतीत जपली गेली आहेत. मंगेश पाडगावकरांनी लिहलेले 'कधी बहर कधी शिशिर' हे गाणे बाबूजींच्या तोंडून प्रथम ऐकल्यावर पाडगावकर म्हणाले, "माझे शब्द मला नवे नव्हते, पण सुधीर फडक्यांच्या तोंडून ऐकताना माझेच शब्द मला नव्याने भेटत होते, माझी कविता नव्याने जन्म घेत होती". कवितेतला विरोधाभास दाखवणारी धुंदी आणि निराशा बाबूजींच्या गायनातून अतिशय उत्कटतेने प्रकट झाली आहे.



विठू माउली तू, तुझे रूप चित्ती राहो, कानडा राजा पंढरीचा सारखी भक्तीरसाने भरलेली भक्तीगीते असोत वा घननीळा लडिवाळा, सावळाची रंग तुझा, उठी श्रीरामा पहाट झाली, प्रेमवेडी राधा, का रे दुरावा, लिंबलोण उतरू कशी, हवास तू अशी त्यांनी संगीतबद्ध केलेली आणि इतर मान्यवर गायिकांनी गायलेली विविध भावना दाखवणारी गाणी असोत, श्रोत्यांना काय अभिप्रेत आहे आणि त्यांना आपण काय पोहचवायचे आहे त्याबद्दल बाबूजी ठाम असायचे. गदिमांनी लिहलेले आणि माणिक वर्मांनी गायलेले 'सावळाच रंग तुझा' या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्यावेळी बाबूजींच्या बारीक बारीक कटाक्षांमुळे ते गाणे कसे सुरेल आणि सुंदर गाऊ शकले हे माणिक वर्मांनी लिहले आहे. गायकाच्या आवाजाचा पोत लक्षात घेऊन गाण्यासाठी निवड करणाऱ्या बाबूजींच्या त्या संबंधित असलेल्या कल्पना किती पक्क्या आणि स्पष्ट होत्या ते त्या सांगतात. त्यांच्या ताल आणि सुरांच्या तीक्ष्ण ज्ञानामुळे आणि त्याबद्दलच्या काटेकोरपणामुळे ते नेमक्या हव्या त्या स्वरात वादकांकडून वाद्ये वाजवून घेतल्याशिवाय पुढे जात नसत. त्यांच्या भोवतीच्या तयार झालेल्या प्रसिद्धीच्या वलयामागे त्यांची प्रचंड साधना, चिकाटी, कष्ट आणि जिद्द आहे हे त्या नमूद करतात.' भाभीकी चुडिया' मधले त्यांनी संगीतबद्ध केलेले अतिशय प्रसिद्ध गाणे 'ज्योती कलश छलके' ह्या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळी वादकांची वाद्ये त्यांच्या मनाप्रमाणे सूरात नसल्याने त्यांनी रेकॉर्डिंग थांबवल्याचा किस्सा लतादीदी सांगतात. त्यांच्या या उत्तम गुणांमुळेच त्यांनी गदिमांचे गीत रामायण घरोघरी पोहचवले.

पुणे आकाशवाणीच्या सीताकांत लाड यांच्या विनंतीला मान देऊन बाबूजी आणि गदिमा यांनी एकत्र येऊन गीत रामायणाची ५६ काव्याच्या स्वरूपात असामान्य रचना केली. दोन्ही प्रतिभावंत एकत्र आल्यानंतर तयार होणारे काव्य म्हणजे महाकाव्यच! बाबूजींच्या ५ दशकातल्या संगीत क्षेत्रातला हा सर्वोच्च महत्वाचा भाग होता. ऑल इंडिया रेडिओवर १९५५-५६ साली वर्षभर त्यांचे गीत रामायण लावले जायचे. आकाशवाणीवर सर्वाधिक लोकप्रियता मिळालेला हा एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम होता. सुरुवातीला गीतरामायण जेंव्हा आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित होत असे तेंव्हा त्याचे ध्वनिमुद्रण सकाळी ८:४५-९:०० या वेळेत प्रसारणाच्या वेळीच होत असे. कधी कधी सकाळी ८ वाजता गदिमांनी लिहलेले रामायणातले गीत बाबूजींना मिळायचे आणि पुढच्या १५ ते २० मिनिटात त्यांची चालही बसायची. त्या अद्भुत शीघ्रतेचे श्रेय नेहमीच ते गदिमांच्या शब्दांना द्यायचे असे माणिक वर्मा सांगतात. "गदिमांचे शब्दच जणू चाल बरोबर घेऊन येतात. त्यांच्या शब्दांच्या उच्चारांना चाल सुचेल असा नाद आहे. " असे ते म्हणत असत. त्यांनी गीत रामायणाचे देशविदेशात १८०० कार्यक्रम केले. त्यांचे चिरंजीव श्रीधर फडके लिहतात, "रामायणातील व्यक्तिरेखांप्रमाणे ते गाणे सादर करीत. गाणे ऐकताना, तो तो प्रसंग, ती ती व्यक्तिरेखा श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभी राहे". यमन रागात स्वरबद्ध केलेले, भरताला उपदेशपुर्ण असलेले 'पराधीन आहे जगती' हे गाणे माझ्या आजीचे खूप आवडीचे होते. गदिमांच्या दैवी लेखणीतून उतरलेली, बोली भाषेतली, जीवनमूल्यांची माहिती देणारी ही प्रेरणादायी गीते बाबूजींच्या सुरेल चाली आणि स्वरांनी अक्षरश: स्वर्गीय झालेली आहेत.

श्रीधर फडके सांगतात, "संगीत आणि गायनाबरोबर त्यांना राष्ट्रीय आणि सामाजिक विषयांचही सजग भान होते". ते कट्टर देशभक्त होते आणि सावरकरांचे चाहते होते. 'इंडिया इज माय होम' या प्रकल्पाखाली उत्तर भारतातल्या खेड्यातील शहरी राहणीमानाला मुकलेली अनेक लहान मुले महाराष्ट्रातील मोठ्या शहरात रहाण्यासाठी आणली गेली होती. त्यातला अरुणाचल प्रदेशातून आलेला ७ वर्षाचा मुलगा, 'दीपक' त्यांच्या घरी राहू लागला आणि त्यांचा दुसरा मुलगा बनला. "श्रीधरच्या जोडीने दीपक आमच्या घरी वाढला" असे ललितााताई सांगतात. देशाच्या प्रगतीसाठी त्यांची सतत धडपड असे. देशाची परिस्थिती बदलावण्यासाठी स्वतःकडून जितके चांगले काम करता येईल तितके करण्याचा त्यांचा कटाक्ष होता. १९६७ सालातल्या कोयना भूकंपाने होरपळलेल्या जनतेसाठी, ७२ सालच्या नागपुरातल्या दुष्काळग्रस्तांसाठी त्यांनी निधी संकलनासाठी गीत रामायणाचे प्रयोग केले. त्यांचे आदरस्थान असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांवर चित्रपट काढण्याचे त्यांचे स्वप्न ऐन आजारात सुद्धा जिद्द, खूप कष्ट आणि हिंमत ठेऊन पूर्ण केले.

असे हे सज्जन, शिस्तप्रिय, अत्यंत साध्या राहणीमानाचे, मोठेपणा न मिरवणारे, कमालीचे प्रतिभावंत आणि मोठा नावलौकिक मिळवलेले, रसिकांचे आवडते गायक आणि संगीतकार सुधीर फडके! मराठी चित्रपट सृष्टीत इतका मान आणि आदर मिळूनसुद्धा अतिशय समाधानाने एक मध्यमवर्गीय मराठी माणसाचे जीवन ते जगले. त्यांना ऐषोआरामाचे, विलासी जीवन अजिबात पसंत नव्हते असे त्यांच्या स्नुषा चित्रा फडके सांगतात.

संगीताच्या मनापासून असलेल्या आवडीमुळे, बालपणीच्या बहुमूल्य आठवणींबरोबर बाबूजींच्या अनेक गाण्यांना मी माझ्या स्मृतींमध्ये जपून ठेवले आहे. त्यांच्याच गीतातून सांगायचे झाले तर,

**“अशी पाखरे येति आणिक स्मृती ठेउनी जाती**

**दोन दिसांची रंगतसंगत, दोन दिसांची नाती...”**



## -स्मिता कुलकर्णी

RUCHI
INDIAN CUISINE



# शब्दप्रभू ग. दि. मा.

देशविदेशात पसरलेल्या असंख्य मराठी लोकांच्या भावविश्वात अढळ स्थान असलेली त्रयी म्हणजे गदिमा , बाबूजी आणि पुलं. जणू बेलपत्रंच ! प्रत्येक पान वेगळं पण एका देठाने बांधलेलं! मराठी साहित्य आणि संगीत क्षेत्राच्या गाभाऱ्यात ह्या बेलपत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. ह्या वर्षी या तिन्ही दिग्गजांची जन्मशताब्दी आहे हा निव्वळ योगायोग नसावा. मला तरी ही ईश्वरी लीलाच वाटते. एकाच वर्षात जन्म घेतलेल्या या तीन अलौकिक व्यक्तींचे कार्य पाहिले की थक्क व्हायला होते. यातील प्रत्येकाचे कार्य हा एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे.

ग. दि. माडगूळकर म्हणजे गदिमा यांची किती रूपे वर्णावीत ! कवी, कथाकार, पटकथाकार, अभिनेता , निर्माता ..जणू सप्तरंगी इंद्रधनू! आणि प्रत्येक रंग हा मनाला तेवढाच लुभावणारा. एका आयुष्यात या माणसाने काय काय केले आणि ते हि उत्तुंग म्हणावे असे कार्य केले.येथे मी गदिमांच्या "कवी" आणि "गीतकार" या पैलूंबद्दल भावना व्यक्त करणार आहे.

गदिमांची ओळख ही सर्वप्रथम पाठ्यपुस्तकातून झाली. "इवल्या इवल्याशा टिकल्या टिकल्यांचे देवाचे घर बाई उंचावरी" या कवितेतून. त्यानंतर दर वर्षी पुस्तकात एक कविता असायचीच. सातवीत असताना "माऊलीच्या दुग्धापरी आले मृगाचे तुषार, भुकेजल्या तान्ह्यासम तोंड पसरी शिवार" ह्या ओळींनी वात्सल्याचं दर्शन घडवलं. "नाच रे मोरा आंब्याच्या वनात" ने थुई थुई नाचवलं. त्यानंतर मला वाटतं बारावीत असेल, "जोगिया" मधल्या कोन्यात पडलेल्या सतारीने आर्त केलं होतं. तारुण्यात पदार्पण करताना "आज कुणीतरी यावे" ह्या शब्दांनी मुग्ध केलं होतं. "घननीळा लडिवाळा झुलवू नको हिंदोळा" ने उगाचच झुल्यावर बसण्याचे स्वप्न दाखवले होते. "त्या तिथे पलीकडे तिकडे, माझिया प्रियेचे झोपडे" या शब्दांनी तर वेड लावले होते. आणि हो ..."लपविलास तू हिरवा चाफा" ची अबोल पण सुगंधी प्रीतभावना केवळ अप्रतिम ! माझी आई ही गीते गुणगुणायची. त्यामुळे त्यातील शब्द व भावना आणखीनच हृदयाच्या जवळचे वाटतात.

कोकणातील एका छोट्याशा गावातून मी नोकरीच्या ट्रेनिंग साठी मुंबईला गेले त्यावेळी आलेला न्यूनगंड, बुजरेपणा हा "एका तळ्यात होती" च्या साथीने पार नाहीसा झाला आणि आपणही काही करू शकतो असा आत्मविश्वास मिळाला. असे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर गदिमा भेटत गेले आणि आपलेसे झाले. ते शब्दप्रभू आणि महाकवी होते हे खरंच आहे. पण सामान्यातल्या सामान्य व्यक्तीशी ते रिलेट झाले आणि हेच त्यांचे वेगळेपण त्यांना आधुनिक वाल्मिकी बनवून गेले.. "गीतरामायण" हा त्यांच्या आयुष्यातील कळसाध्याय म्हणता येईल. गदिमांचे अलौकिक शब्दलावण्य आणि बाबूजींचे दैवी सूर यांचा उत्तुंग आविष्कार म्हणजे गीतरामायण! रामायण हे महाकाव्य म्हणजे शिवधनुष्य ..पण ते गदिमांनी लीलया पेलले आणि प्रतिभेच्या आम्रवनातील वसंतवैभव गाताना ते जणू कोकीळ होऊन गेले.



“स्वये श्री " या प्रारंभीच्या गीतापासून शेवटच्या गीतापर्यंत भावभावनांचा कल्लोळ समर्थपणे साकारलेला दिसतो. जानकीचा स्वयंवरातील मुग्ध लाजरेपणा, भरतभेटीची व्याकुळता, सीताहरणाच्या वेळचे जटायूचे आक्रन्दन, "सेतू बांधा रे " मधून स्फुरणारा वीररस, श्रीरामाचे स्वागत करतानाचा अयोध्यावासियांचा आनंद आणि हनुमंताची श्रीराम चरणी लीन होण्याची प्रार्थना अशी अगणित सौंदर्यस्थळे गीतरामायणात आहेत. ती अनुभवताना आपण अक्षरशः स्तिमित होऊन जातो. गीतरामायणाकडे बघताना वाटते की एवढे एकंच कार्य यांच्या हातून घडते तरी ते महाकवी या सन्मानाला पात्र आहेत. पण बघा ना ...बालगीते , भावगीते , लावणीपासून ते भक्तिगीतांपर्यंत केवढा विस्तीर्ण पट त्यांच्या लेखणीने विणला.

"एक धागा सुखाचा" आणि "पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा" यासारख्या अजरामर रचनांमधून जीवनाचे शाश्वत सत्य सांगणाऱ्या या अलौकिक व्यक्तिमत्वास त्रिवार वंदन!मी काही कुणी समीक्षक नाही किंवा तज्ज्ञ नाही. पण अनेक पिढ्यांवर अधिराज्य गाजवणाऱ्या या रचनाकाराचे स्मरण करताना पुनः प्रत्ययाचा आनंद मिळाला. गदिमांच्या काव्यसरींमध्ये चिंब भिजून तृप्त झालेल्या असंख्य रसिकांच्या भावनांचं शब्दांकन करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न !



**- प्रतिभा कुलकर्णी**

Reliance™
SuperMart

****************************************************************************************************

Poonam S. Kelkar
Leisure Travel Planner

PSK Travel

Tel: 916-539-0221
Email: Support@psktravel.com
www.psktravel.com

The easy way to get away


Cruise|Tour|Hotel|Car|Rail|Air

# पु .ल.

‘पु. ल.’ ह्या नावापुढे अजून काय ओळख करून द्यायची! अहो त्यापुढे ‘देशपांडे’ तरी म्हणायला हवे का? ‘कृष्ण’ यातच सर्व काही आले. त्या अवताराची ओळख ‘कृष्ण वासुदेव यादव’ अशी करून द्यायची नाही व त्याची गरज नाही. ‘पु.ल.’ एव्हढे शब्दच मराठी माणसाला स्तब्ध करतात. ‘पु.ल.’ या किमयागाराने मराठी माणसाच्या हृदयावर, मनावर अनेक वर्षे राज्य केले. त्या माणसानेपण ती बांधिलकी आवडीनी मानली व अजूनहि ते राजपद इथे ह्या काळजात कोरलंय!

कलाक्षेत्रात पुलंकडे कोठली प्रतिभा नव्हती! नुसती होती असे नाही तर उच्च, उत्तुंग प्रतीची प्रतिभा होती. त्यापुढे जाऊन असे आढळते कि या सगळ्या कलागुणांची एकत्र गुंफण, एक समन्वय साधण्याची कला आणि प्रतिभापण पुलंमध्ये अजोड होती. म्हणूनच पुलंनी उच्च कोटीचे लिखाण, नाटक-सिनेमे, भाषणे, एकपात्री प्रयोग, गीते, संगीत, गायक, वादक यांचे जणू भांडारच उघडले. विनोदी, प्रवास, सामाजिक, राजकीय, कौटुंबिक असे अनेक प्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले व पेश केले. पुन्हा ह्या सर्व प्रदर्शित गोष्टी विनोदी अंगाकडे झुकत असल्याने त्याची मजा रसिकांसाठी काही औरच. पुलंनी आपल्या सर्वांना जणू असे सांगितले कि “मराठी माणसा, घे घे हात भरभरून घे माझ्याकडून”. आमचे हात, मन कमीच पडेल इतके त्यांनी दिले. आजही रसिक मराठी त्यांची कलेची रत्ने लुटत आहेत. पिढया आल्या व गेल्या तरी कलेची ही दालने सगळ्यांना सामावून घेण्यासाठी समर्थपणे खुली आहेत व लोक गर्दी करून आजही पुलकित होत आहेत. आता बघा...जो देतो तो दाता अन जो सतत देत राहतो तो देव. पुलंनी सतत आपल्याला दिले. होय ना? म्हणूनच पु.ल. मराठी माणसाचे देवच नाही का! निदान ‘देवाप्रमाणे’ अमरता त्यांना मिळाली हे नक्कीच.

सर्वसाधारणपणे कोठल्याही कलेचा आदर एका विशिष्ट काळात होतो असे आढळते. कलेचे प्रदर्शन, आविष्कार व मिळालेली मान्यता, लोकप्रियता एका विशिष्ट काळात होते. ती कला लोपत नाही पण काळच बदलतो, समाजाची बैठकच बदलते व कलेची आठवण पुसट होते. ‘सैगल’ हा कमालीचा यशस्वी त्याच्या काळात. लोकांनीच काय तर इतर गायकांनीपण त्याला डोक्यावर घेतले. नव्हे! नक्कल करून स्वतःची कारकीर्द सुरु केली. जणू युगे राज्य करील असे ‘सैगलत्व’ पसरले होते. सैगल हा सैगलच असणार. पण सांगा ना, आज किती तरुणांच्या तोंडात सैगलगीते आपोआप येतात? मी स्वतः सैगल अजूनही ऐकतो व त्यांचा अनादर करण्याचे प्रयोजन नाहीच नाही.. पण लोकप्रियता व तीही अकालाबाधित अशी लोकप्रियता हे एकमेव परिमाण मानले तर सैगल ‘कालचा’ असेच म्हणावे लागेल. पुलंचे अद्वितीयत्व हेच कि काळाच्या पलीकडे जाऊन त्यांचे उच्च स्थान अजूनही टिकून आहे. आजही लोक त्यांच्या नाटक-सिनेमाना तिकिटे देऊन गर्दी करतात. पुलंचे ‘युट्यूबत्व’ आजही वाढतच आहे (कसा वाटला, नवीन शब्द ‘युट्यूबत्व’?, अहो पु. लं. बद्दल लिहिताना नकळत मला पण पुलकित गुण लागला कि काय!).





मी ह्या लेखात पुलंची नाटके, सिनेमे, पुस्तके, प्रयोग वगैरेची यादी बिलकुल देणार नाहीये. एकतर तुम्हा सर्व रसिकांना ति यादी तोंडपाठ आहेच व इंटरनेटवर नुसते 'पुल' असे लिहिले तर २०१९ च्या पावसासारखा धो धो पाऊस त्यांच्या प्रगल्भतेचा पडतो. जी यादी तुम्हाला माहिती आहे, तीच परत इथे लिहायची हे ह्या लेखाचे प्रयोजन नाहीये. तसेच मिळालेल्या लिहिण्याच्या जागेचा दुरुपयोग निदान 'पुल'ना स्मरून, ज्यांनी फक्त 'चपखलच' लिहिले, त्यांच्याबद्दलच्या लेखात 'केवळ यादी देणे' हा अपमान नाही करणार. यादी दिली तर एक तर ती खुपच लांब आहे व विषय रुक्ष करून सोडेल. नाहीतर इतिहास विषय कसा 'सनावळी' नामक भयानक राक्षसाने आपल्या शाळेत रुक्ष करून इतिहास मधला 'हास' काढून परीक्षेतील गुणांची 'इति'श्री केली एकेकाळी आपली, तसे मी 'पुल' यांची "अमुक वर्षी तमुक नाटके" अशी यादी देऊन होईल, म्हणून ति यादी देत नाही. (अरेच्चा , "इतिहास, इति, हास" यावर शब्दांची कोटी करण्याची प्रेरणा बहुतेक पुलंनीच आकाशातून माझ्या अंगात लिहिता लिहिता शिरवली असे वाटते!).

मोठी यादी दिल्याने 'पुल' मोठे नाहीत. देवाचे कौतुक करायचे नसते, तर गुणगान करायचे असते. सगळ्या आरत्या देवाला 'शाब्बास' नाही म्हणत,, तर 'जयदेव, जयदेव' हेच फक्त स्मरण करून विनम्र नमस्कार अर्पण करतात. 'जे देवाचे तेच पुलंचे' असे मी मानतो. आईवडिलांना मुलांनी शाबासकी द्यायची नसते व त्यानी केलेल्या कामाची यादी नसते करायची, तर आई-वडिलांचे ऋण मानायचे, त्यांना जवळ करायचे, त्यांसारखे होण्याचे प्रयत्न करायचे असतात. तोच संदर्भ मी पुलंबद्दल लावतो व म्हणूनच मी त्यांच्या कामाची यादी इथे देत नाही.

आपण मराठी माणसं लई नशीबवान बघा. देवाने महाराष्ट्राला संतपरंपरा व कलापरंपरा मुबलक दिली. आज ह्या अशा परंपरेमुळेच मराठी माणूस ह्या युगात, ह्या अमेरिकेतही आपलेपण जपून आहे. आजही मुलांना श्लोक व संगीत, नाच, वाद्य द्यायला मराठी माणूस बघतो. परंपरा जपतो. ती कलापरंपरा हजारो वर्षे कायम राहील व वाढेल आणि हे 'पुलं'नी केलेल्या अजोड कार्यामुळेच शक्य आहे. माझ्या मराठीच्या अभ्यासात, कलेच्या इतिहासात एक 'प्र.के. अत्रे' सोडले तर पुलंएव्हढी भरगोस कलेची देणगी महाराष्ट्राला, मराठीला कोणी अलीकडच्या काळात दिली असे आढळत नाही.

असे आपले सर्वांचे "पु.ल"...... हवेहवेसे वाटणारे 'पुल'. 'पुल' ह्या मोठ्या वटवृक्षाखाली माझी पिढीच काय पण पुढच्या अनेक पिढया सावलीत नितांत आनंदाने 'पुलकित' होत राहतील हीच सुखाची नांदी. त्यांच्या १००व्या जन्मवर्षानिमित्त माझ्यातर्फे, सर्व रसिकांतर्फे, 'पुलं'चे ऋण मानतो, त्यांना मानवंदना देतो व हे 'पुल' लेखरूप 'फुल' त्यांना अर्पण करतो.

धन्यवाद,

आपला नम्र



**अजित नातू**
**अध्यक्ष, मराठी मंडळ सॅक्रामेंटो**




CHICAGO'S
PIZZA
With-A-Twist

# 'भाई' चित्रपट माझ्या नजरेतून

मी काही चित्रपट समीक्षक नाही. आजपर्यंत कुठल्याच सिनेमाचा review लिहावा असं वाटलं नाही. या वर्षाच्या सुरुवातीला "भाई - व्यक्ती की वल्ली " हा सिनेमा पाहिला आणि त्या बद्दल लिहावंसं वाटलं. आजपर्यंत जेव्हा जेव्हा पुलं भेटले तेव्हा फक्त आणि फक्त आनंदच देऊन गेले. निखळ आनंद म्हणजे काही फक्त "हसू" नव्हे . ते "हसू" आणि "आसू " यांचं अजब मिश्रण आहे . या चित्रपटातूनही पुलं भेटले आणि तसाच शुद्ध , सात्त्विक आणि निखळ आनंद देऊन गेले.

काही माणसं आनंदाची उधळण करायलाच पृथ्वी वर जन्म घेतात. पुलं म्हणजे असाच एक आनंदयात्री. या माणसाबद्दल लिहायला खरं तर शब्दच सापडत नाहीत. एकीकडे त्यांच्या असामान्य प्रतिभेपुढे नतमस्तक व्हायला होतं तर दुसरीकडे ते इतके "आपले" वाटतात कि त्यांना "पुलदैवत " वगैरे म्हणून देव्हाऱ्यात बसवावं असंही वाटत नाही. पुलंना प्रत्यक्ष भेटण्याचं भाग्य काही मिळालं नाही. पण त्यांना लेखक म्हणून वाचलं , गायक आणि संगीतकार म्हणून ऐकलं , दिग्दर्शक आणि नट म्हणून पाहिलं आणि या सगळ्याची गोळाबेरीज होऊन "माणूस" म्हणून अनुभवलं.



तर अशा या सामान्यातल्या असामान्य वल्ली ला पडद्यावर साकारणं नक्कीच सोपं नाही. पण पुलंच्या भूमिकेला सागर देशमुख या अभिनेत्याने न्याय दिला असं मनापासून वाटलं. सुनीताबाईंबद्दल मला फारसं माहिति नव्हतं पण इरावती हर्षेने साकारलेली "सुनीता ठाकूर " आणि "सुनीता देशपांडे" आवडली. पुलं आणि सुनीताबाईंचं एकमेकातलं tuning या दोन कलाकारांनी छान साकारलंय.

या सिनेमाचा musical highlight म्हणजे कुमार गंधर्व , डॉ वसंतराव देशपांडे आणि भीमसेन यांची सुरेल मैफल. "सावरे ऐजैय्यो " आणि "कानडा राजा पंढरीचा" चं सादरीकरण अप्रतिम जमलंय. "Casting" ही या चित्रपटाची जमेची बाजू. पुलं आणि सुनीताबाईंच्या lead role बरोबरच इतरही काही महत्वाच्या व्यक्तींचं casting सुंदर झालं आहे. स्वानंद किरकिरे कुमारजींच्या भूमिकेत एकदम परफेक्ट वाटले . सागर तळाशीकर गदिमांच्या भूमिकेत चपखल वाटले. सुप्रसिद्ध ऐतिहासिक बालगीत "नाच रे मोरा" च्या निर्मितीचा प्रसंग खूप छान जमला आहे. हृषीकेश जोशी "रावसाहेब" म्हणून फक्त काही मिंटंच येतात पण धमाल आणतात. खूप दिवसांनी इतका सहज सुंदर सिनेमा पहायला मिळाला. हा पूर्वार्ध मस्त जमला आहे आणि त्यामुळे "उत्तरार्धा" बद्दल अपेक्षा आणि उत्सुकता वाढली आहे. एकूणच इतक्या सुंदर आणि "पुलकित" करून टाकणाऱ्या कलाकृतीची निर्मिती केल्याबद्दल दिग्दर्शक महेश मांजरेकर आणि संपूर्ण टीमचं मनापासून अभिनंदन!!



**-हिमानी कुलकर्णी**


FARMERS
INSURANCE
AMITA NATU
6049 Douglas Blvd, Granite Bay, CA, 95746.
Office : (916-993-5934) Cell: (408-203-24130)
anatu@farmersagent.com
CA License 0133000
I can help you get the right Insurance Coverages for your specific needs.
Protect your family with the right amount of coverage.
HOME, AUTO, UMBRELLA, ANNUITIES, LIFE, MOTORCYCLE, BUSSINESS
WORKERS COMP, SPECIALITY INSURANCE.

***************************************************************************


This Diwali, send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
www.mithai4all.com
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries
Celebrate Diwali with Mithai4all

# अनमोल पुंजी

गदिमा, पुलं आणि बाबुजी
मराठी रंगभूमीला मिळालेली अनमोल पुंजी
लेखन, गायन, वादन वा संगीत
अविरत वाहणाऱ्या अलौकिक प्रतिभेचे तिघे ज्वलंत बीज

पावसात नाचून बालकांना आनंद देणारा गदिमांचा आंब्याच्या वनातील मोर
एसटी बसच्या वाटेत आलेल्या पुलंच्या कोकणी म्हशीने उडवलेला हल्लकल्लोळ
चंद्रम्याच्या शीतल चांदण्यातून फिरताना हरवलेल्या प्रेमाचे
काळजाला हात घालणारे बाबूजींच्या स्वरातील विरहाचे सुरेल बोल

हृदय भरून आणणारे गीत रामायणाचे माधुर्य
"पराधीन आहे" म्हणणारा भावपूर्ण राम ऐकताना पाणावणारे नेत्र
मनापासून झालेल्या पुस्तकी मैत्रीने बटाट्याच्या चाळीतल्या असामी धोंडोपंतांचे
हृदयावर कोरले गेलेले गहिरे विनोदी स्मरणचित्र

सुखदुःखांना दिला मराठी रसिकांच्या तिघांनी शब्द आणि सूर
योगदान केले निरपेक्षपणे आपापल्या क्षेत्रात न बांधता खोट्या सन्मानाचे पूल
कथा, पटकथा, संवाद, गीते, निर्मिती, अभिनय, संगीत असा मोजता न येणारा त्यांच्या कलेचा आवाका
अनेक रसांची मुक्त उधळण करणारा महाराष्ट्राच्या लोकजीवनाला मिळालेला मनोरंजनाचा अपार साठा

साक्षात सरस्वतीचा वारसा मिळालेले हे दिग्गज
मराठी भाषेच्या संस्कृतीला श्रीमंत करणारे किंमती ऐवज
शब्दात न बांधता येणाऱ्या त्यांच्या कार्याला नसे कशाची सर
होई अभिवादन तयांना नम्रतेने जुळुनी दोन्ही कर



## -स्मिता कुलकर्णी

# चित्रकथी: दीपावली




छायाचित्र: सुलभा हारदे




**छायाचित्र: सुलभा हारदे**

INCHIN'S
BAMBOO GARDEN
pan asian cuisine

# फ्लॅशबॅक: आयुष्य

(अचानक एवढ्या जड विषयाला हात घातलाय म्हणून कदाचित अनेक जणांच्या भुवया उंचावल्या जाऊ शकतात पण खास लोकाग्रहास्तव लिहीत आहे. काना, मात्रा, व्याकरण ह्यातील चुका जाणकारांनी कृपया माफ कराव्यात)

तर, आज आम्हाला आयुष्य म्हणजे काय हे इतरांना समजावून देण्याचे जणू बाळकडूच मिळाले आहे अशा आवेशात लेखणीला कपाटातून धुंडाळून काढलयं. एरवी, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' हया वचनाचे अगदी काटेकोरपणे पालन करणारे आम्ही आज अचानक हया विषयाकडे वळतोय म्हणजे नक्कीच कशाचा तरी साक्षात्कार झाला असणार ह्यात वादच नाही.नुकताच तग धरलेल्या छोट्याशा रोपट्याने एकाएकी तरारून उभारी घ्यावी तशी अचानक माझ्यातली लेखिका जागी झाली असावी.असो, नमनालाच घडाभर तेल नको.

Coming back to topic, आयुष्य म्हणजे काय? आपल्याला आयुष्यात ज्या गोष्टी मिळवायच्या असतात, त्या मिळवण्याच्या प्रयत्नात असताना ज्या गोष्टी मिळत जातात कदाचित आयुष्य त्यांनीच बनत. एखादा मोठा आनंद गाठण्याच्या शर्यतीत असताना जे छोटे छोटे आनंद अचानक भेट देऊन जातात कदाचित तेच खरे असतात.

म्हणजे असं पहा ... पदवी अभ्यासक्रमात असतानाचा, एक प्रसंग आठवतो. माझा दोन दिवसांनी पेपर होता आणि कधी नव्हे ते माझ्याकडे अक्षरशः काहीही notes नव्हत्या. तेव्हा जगातलं सगळ्यात मोठ दु:ख माझ्याच वाट्याला आलं आहे असे भाव चेहर्‍यावर घेऊन मी librarian ची वाट पाहात होते. पुढील अठरा सेकंद मी परवाच्या दिवशी माझ्यावर बेतणारया भयाण प्रसंगाची कल्पना करण्यात घालवली. पण मात्र, जेव्हा मला हवं ते पुस्तक घेऊन येताना जेव्हा तो librarian माझ्या द्रुष्टीस पडला, तेव्हा तो ' कासे पीतांबर, कस्तुरी लल्लाटी' अशा रुपातला साक्षात पांडुरंग च माझ्या मदतीला धावून आला आहे असा भासला आणि जगविख्यात सतारवादक माझ्यामागे उभे राहून अतिद्रुत लयिमध्ये मल्हार राग अक्षरशः बडवत आहेत असा आनंदाचा झरा माझ्या चेहर्‍यावरून पाझरत होता. पण, पुढच्याच क्षणी सगळ्या सतार वादकांनी ती मैफल आवरती घेतली. जेव्हा इतका वेळ देवदूत वाटणारा तो librarian म्हणाला की, "हे पुस्तक इथेच वाचून परत कर. हे मी घरी देऊ शकत नाही. " मग काय आधीच, anxiety मध्ये असलेली माझी स्वारी, ( ज्याने कोणी 'Xerox' चा शोध लावला त्याला मनोमन कोटी- कोटी प्रणाम करून) Xerox च्या दुकानाकडे निघाली आणि Xerox करुन झाल्यावर मी college च्या दिशेने निघताना , अगदी रणांगणावरच घणाघाती युद्ध संपवून, एखाद्या योद्ध्याने आपली तलवार म्यान करावी अशा अविर्भावात गाडी self start केली. तितक्यात, समोरुन जाणाऱ्या टॅंकरने त्याच्या संततधार पाण्याचे काही तुषार माझ्या चेहर्‍यावर उडवले. एरवी, किती पाणी वाया घालवतात हे टॅंकर-वाले अस सुजाण नागरिकासारख वक्तव्य करणारी मी त्या तुषारामुळे खरच सुखावले गेले होते. त्यामुळे एकिकडे काही वेळापूर्वी स्वत:ला जगातली सगळ्यात दु:खी समजत असताना दुसरीकडे चेहर्‍यावर स्मितहास्य घेऊन मी निघाले होते.

"दुःखाच्या एखाद्या झळेनंतर, सुखाचे अनेक तुषार" अशीच असावी आयुष्याची व्याख्या. कदाचित हेच आयुष्य आहे

किंवा ... हेच आयुष्य आहे ?

## - भगवती कौस्तुभ उपाध्ये

# उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर



# Visit us at

## www.mmsac.org

Like us on Facebook

Contact us at

mmsac.committee@gmail.com